RNI No. MAHBIL/2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ५, अंक २६(२)] शनिवार, फेब्रुवारी १६, २०१९/माघ २७, शके १९४० [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ५८

**प्राधिकृत प्रकाशन**

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

**ग्रामविकास विभाग**

बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ, फोर्ट,
मुंबई ४०० ००१, दिनांक १२ फेब्रुवारी २०१९

**अधिसूचना**

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५.**

क्रमांक आरटीएस-२०१८/प्र.क्र. १४५/आस्था.५.—ज्याअर्थी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ (सन २०१५ चा महा. अध्यादेश क्रमांक ५) च्या कलम-३ चे पोट-कलम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार काढण्यात आलेल्या ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या अधिसूचना क्रमांक आरटीएस-२०१५/प्र.क्र. ३२/पंरा-५, दिनांक १० जुलै २०१५ (यापुढे जिचा "उक्त अधिसूचना" असा उल्लेख करण्यात येत आहे.) द्वारे ग्रामविकास विभागामार्फत ग्रामपंचायतीद्वारे पात्र व्यक्तींना देण्यात यावयाच्या लोकसेवा आणि त्यासोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे उक्त अध्यादेशाच्या प्रयोजनार्थ अशा लोकसेवा देण्याकरिता विहित कालमर्यादेसह पदनिर्देशित अधिकारी आणि प्रथम अपील प्राधिकारी व द्वितीय अपील प्राधिकारी अधिसूचित करण्यात आले आहेत ;

आणि ज्याअर्थी, सेवा पुरविण्याचा कालावधी वाढविण्याबाबत महाराष्ट्र शासनास काही निवेदने प्राप्त झालेली आहेत, आणि त्याअर्थी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत सेवा पुरविण्याचा कालावधी वाढविणे व काही सेवा वगळणे उचित असल्याचे शासनास वाटले आहे ;

त्याअर्थी, आता महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ (सन २०१५ चा महा. अधिनियम ३१) च्या कलम ३ चे पोट-कलम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्याबाबतीत महाराष्ट्र शासनास समर्थ करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन सदर अधिसूचनेमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

सदर अधिसूचनेसोबत जोडलेल्या अनुसूचीऐवजी खालीलप्रमाणे अनुसूची प्रतिस्थापित करण्यात येत आहे :—

## अनुसूची

| अ. क्र. | लोकसेवेचे नाव | लोकसेवा पुरविण्यासाठीची कालमर्यादा (कामकाजाचे दिवस) | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपील प्राधिकारी | द्वितीय अपील प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | जन्म नोंद दाखला | ७ दिवस | ग्रामसेवक | सहायक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी |
| २ | मृत्यु नोंद दाखला | ७ दिवस | ग्रामसेवक | सहायक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी |
| ३ | विवाह नोंद दाखला | ७ दिवस | ग्रामसेवक | सहायक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी |
| ४ | दारिद्र्य रेषेखालील असल्याचा दाखला | ७ दिवस | सहायक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) |
| ५ | ग्रामपंचायत येणेबाकी नसल्याचा दाखला | ५ दिवस | ग्रामसेवक | सहायक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी |
| ६ | नमुना ८ चा उतारा | ५ दिवस | ग्रामसेवक | सहायक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी |
| ७ | निराधार असल्याचा दाखला | २० दिवस | ग्रामसेवक | सहायक गट विकास अधिकारी | गट विकास अधिकारी |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

पंडित जाधव,
शासनाचे उप सचिव.